ISSN 2278-3954 Saptahik Nagara

# साप्ताहिक नगारा

संस्थापक संपादक : दलितमित्र स्व. गोविंदराव गोरवाडकर

R.N.I. No. 16746/67 पोष्टाचा परवाना क्र. एम.जी.एन.३९/२०१८-२०२०

श्री. ______

पत्ता ______

वरील पत्त्यावर अंक न पोहोचल्यास परत पाठविण्याचा पत्ता : मा. संपादक सा. नगारा, ८५२, गोरवाडकर वाडा, मालेगांव कँम्प (नाशिक)

NAGARA WEEKLY

* मंगळवार दि. १९ नोव्हेंबर २०१९



'मेरी झाँशी नही दूँगी' असे तेजस्वी उद्गार काढणाऱ्या झाशीच्या राणी लक्ष्मीबाईंचा आज जन्मदिन

# लोणच्याचा खार




॥ मुक्तक ॥

प्रा.सुरेश भिलकोटकर
मो. : ९४२१६०९४३७

(लेखक मुक्त विद्यापीठात प्राध्यापक आहेत.)

मी दुसरीत असेल. बहुधा त्या दिवशी सुट्टी असावी. मी आईबरोबर शेतात गेलो होतो. आषाढ-श्रावण महिन्याचे दिवस होते. बाजरी आणि भुईमुगाची निंदणी ऐन भरात होती. त्या वर्षी पाऊसमान बरे असल्याने शिवार हिरवेगार होते. बाजरी पोग्यावर आलेली होती. भुईमुगाला पिवळा फुलोरा फुलत होता. कोवळ्या मुगाच्या शेंगा छोट्या झाडांवर लयऱ्या मारत होत्या. चवळीच्या शेंगाही आकार घेत होत्या. शेतागणिक निंदणी जोरात होती. काही शेतकऱ्यांची पसात असल्याने पिकांमध्ये कोळपणी चालू होती. रानातील पशु-पक्ष्यांच्या आवाजाला बैलांच्या गळ्यातील घोगर-घुंगरु नि टापरे साथ करीत होती.



आई नि काकू दोघी दररोज रोजाने इतरांच्या शेतात जायच्या. पण आज आपापल्या शेतात निंदणीच्या कामासाठी आल्या होत्या. मी ही आठवडाभरानंतर शेतात आलो होतो. इकडे तिकडे उंडारत होतो. या बांधावर जा.. त्या झाडावर चढ.. असे माझे उद्योग चालू होते. 'पडशील.. काटा मोडेल... जरा सांभाळ.. असे हाकारे आई आणि काकूंकडूनही मला अधूनमधून दिले जात होते.

अशातच एका बाभळीच्या झाडावर मी चढलो. झाडावरुन शिवाराची शोभा पाहण्याचा आनंद वेगळाच असायचा. बाभळाचे झाड चांगलेच उंच होते. चढताना सहज चढलो पण उतरताना मला जमेना. झाडाच्या खोडाला पकडत दोन्ही पाय बेडकासारखे नेत मी सरसर चढलो होतो. पण मला सहजपणे उतरता येईना. तेवढ्यात आईने हाक मारली. एका हाकेवर मी पुढ्यात हजर झालो नाही तर अनेकदा आई रागवायची. मी उतरायचा प्रयत्न केला. पण झटपट उतरणे अवघड होते. तितक्यात आईची दुसरी जोराची हाक आली. पण शक्य होईना. जेथे मी पोचलो होतो तेथे तीन फांद्याचा बेचका होता. त्याखाली बाभळीचे सरळ आणि उभट असे दहा-बारा फुटी खोड होते. तेथून उडी मारणे अवघड होते. झाडाखालच्या गवतात नि जमिनीवर धारदार काटे होते.

आईची दुसरी हाक ऐकली.. तसा मी अधिकच घाईत उतरायची धडपड करु लागलो. पण शक्य होईना.. तितक्यात आईची पुन्हा आरोळी आली. मी घाबरलो .. दोन्ही हातांनी आणि पायांनी खोडाला घेरण्याचा प्रयत्न करू लागलो.. पण हाताची पकड जमेना.. आईची भीती वाढू लागली. आई आता चांगलीच रागवेल असे वाटू लागले.. तशाच माझ्या दोन्ही हातांची पकड सैल झाली.. दोन्ही पायांची मिठी खोडाला असल्याने मी तसाच खाली सरकू लागलो.. तसाच काहीसा खाली गेल्यावर खोडाला दोन्ही हातांची मिठी मारण्याचा प्रयत्न केला पण पकड सैल होती.. मी मनातून घाबरलो. घाबरल्यामुळे हाताची नि पायाचीही पकड आणखीन सैल झाली.. यामुळे खोडावरुन सरळ घसरत खाली येऊ लागलो.. जसजसा खाली येत गेलो.. तसा घसरण्याचा वेग वाढत गेला..

मी अर्धी खाकी चड्डी नि हाफ बाह्यांचा सदरा घातला होता. बाभळीचे खोड चांगलेच खडबडीत होते. व्हायचे तेच झाले. माझे हात, छाती, पोट, मांड्या, पाय, पोटऱ्या, तळपाय पार सोलपटून निघाले. बाभळीच्या खोडातल्या खपल्यांमधल्या बारीक शिळका माझ्या त्वचेत ठिकठिकाणी रुतल्या. तशाच अवस्थेत मी धावतच आईकडे गेलो.. प्रारंभी मला फारसे जाणवले नाही. पण जसजसा वेळ जाऊ लागला तसतशी शरीरात ठिकठिकाणी आग सुरु झाली.

आई हातातील काम करता करता मला काहीतरी सांगत होती. तिला प्रतिक्रिया देणे मला आता अवघड जात होते. मी काही बोलत नाही म्हणून तिने वर माझ्याकडे क्षणभर पाहिले.. माझा अवतार बघण्यापलिकडचा होता.. शर्टचे बारा वाजलेले होते..

व्हायचे तेच झाले..तिने तिच्या खास ठेवणीतल्या शिव्या हासडल्या. 'माले आईमरी खावोऽऽ याले..कथा गयथाऽऽ कांजू तरफडाले.. यान्हा हातपायऽऽ भलताच चिडा बोलतंस माय ..एखांद रोज हाऊ कायऽऽ करी नि काय नही..' मी खांबासारखा उभा होतो.. छाती-पोट नि पोटऱ्यांना चांगलेच खरचटल्याने मला होणारा त्रास वाढत होता.. त्यातून होणाऱ्या वेदनेच्या खुणा माझ्या चेहऱ्यावर आता दिसू लागल्या होत्या. एव्हाना ही बाब चिडलेल्या आईच्याही लक्षात आली. ती थांबली.. पोराला जरा जास्तीचेच लागल्याचे पाहून ती कळवळली.. तिने हळूवार माझा सदरा काढला.. माझ्या त्वचेतून अनेक ठिकाणी रक्त येऊ लागले होते.. काही ठिकाणी कातडी सोलून काढल्यागत झाली होती.. माझा चेहरा नि पाठीमागचा भाग वगळता सर्वत्र खरचटले होते.. मी रडवेला झालो होतो.. आईने अधिक शिमगा करु नये म्हणून स्वतःला कसेतरी रोखत होतो.

तिने दुपारची भाकरी सोडली. आज आई दुपारची भाकरी लवकर का सोडते..असा प्रश्न त्या वेदनेच्या गोंगाटातही माझ्या मनात डोकावून गेला. बाजरीच्या भाकरी सोबत लोणचे आणलेले होते. आईने त्यातील खार एका बाजूस वाढला.. काकूला बोलावले.. काकू नि आई यांच्यात काहीतरी मूक संप्रेषण झाले असावे.. मला काही समजायच्या आत काकूने माझे दोन्ही हात घट्ट धरले. आईने लोणच्याचा खार माझ्या खरचटलेल्या भागावर चोपडण्यास सुरुवात केली. काकूने घट्ट धरल्यामुळे मला हलणेही शक्य नव्हते. लोणच्यात तिखट आणि मीठ भरमसाठ होते.. माझ्या सोललेल्या कातडीवर आईचा हात फिरताच प्रचंड आग होऊ लागली.. मी ठणाणा बोंबा मारु लागलो.. माझ्या पाय आपटण्याने आणि ओरडण्याने काकूवर तिळमात्र प्रभाव पडला नाही.

(लोणच्याचा खार पान १५ वर)

## (सरगम विनायक, रंगश्री सुनीता पान ४ वरून)

सरगमला भेटायला बोलावायला हवे होते. व्ही.जीं.नी फोन उचलला व मुलींना भेटायला बोलावले.

रंगश्री व सरगमशी खूप बोलायचे होत. व्ही.जीं.ना....पण सुरुवत कशी करावी? त्यांचे आई बाबा...कसे असतील?...रंगश्री व सरगम डॉक्टर झाल्या का?...सारे प्रश्न डोक्यात फिरत होते....तोच रिटर्न कॉल आला, 'सर मी सरगम बोलतेय, सर निघतोय आम्ही...तुम्हाला भेटायला येतोय.... नक्की....' फोन कट झाला. व्ही.जी....सरगम, रंगश्रीची वाट पाहत दिवाणखान्यात येरझाऱ्या मारु लागले. विद्यार्थिनींच्या भेटीसाठी उत्सुक झाले होते. एक सच्चे शिक्षक. कधी काळी या हुशार मुलींसाठी त्यांनी स्वतंत्र मार्गदर्शन केले होते अगदी विनामूल्य! पण आज त्यांच्या येणारे दोन हिरे त्यांना अगदी मौल्यवान होते यात शंकाच नाही.

मौल्यवान शिक्षकांना असे मौल्यवान हिरे सतत भेटत असतात. मग त्यांच्यापेक्षा इतर सर्वांपेक्षा मौल्यवान ठरतोय. शिक्षकी पेशा सर्वात मौल्यवान पेशा आहे.










## (आशाताई पान ८ वरून)

बऱ्याच संघटनांनी तिच्या कामाची दखल घेऊन तिला पुरस्कार दिले. अगदी अलिकडेच 'स्वावलंबन महिला फाऊंडेशन' कडून सक्षम स्त्रीचा 'तेजस्विता पुरस्कार' तिला जाहीर झालाय. सध्या ती एका नव्या व्यवसायात पाऊस ठेवत आहे. माफक दरात सर्वांना अन्न उपलब्ध करुन देणे, ज्यामुळे हजारो हातांना काम मिळेल. करोडोंचे उदरभरण होईल हा उद्देश यामागे आहे.

मालेगाव सोडूनही तिला २० वर्षे झाली. पण मुंबई महानगरात मालेगावचे नांव तिच्या रुपाने प्रसिद्ध होत आहे. ती आजही आपल्या गाण्याचा छंद जोपासत आहे. इतक्या व्यस्त दैनंदिन व्यापातून ती थोडा वेळ काढून एका कराओके ग्रुपमध्ये गाणे गायला जाते. तिच्यामते ती एक म्युझिक थेरपीच आहे.

अशा या आशाताईंचा व्यवसाय दिवसेंदिवस वृद्धिंगत होवो. तिला खूप आयुष्य आणि आरोग्य लाभो तसेच तिच्या हातून खूप समाजसेवा घडो हीच कामना.

## (लोणच्याचा खार पान ९ वरून)

तिने मला सोडले नाही.. आईनेही तिचे काम थांबवले नाही.. मी विव्हळू लागलो.. संपूर्ण अंग झिणझिणू लागले. हाग-मूत एकाच वेळी होईल की काय.. असे मला वाटू लागले.. पण दोघांनीही आपापली कामे शांतपणे पार पाडली..

लोणच्यातील खारामुळे सर्व जखमा लवकर जळतील आणि भरुन निघतील, अशी दोघींची धारणा होती. दोघींचा उपचार मनाप्रमाणे झाला होता.. पण माझ्या जीवाची लाही लाही होत होती. पुढचा अर्धा-पाऊण तास सर्वांगाची आग-आग सोसल्यानंतर मला थोडे बरे वाटू लागले. पुढे अनेक वर्षे त्या झाडावर चढणे सोडा पण त्याच्या सावलीलाही मी थांबत नसे. त्यानंतर अनेक वर्षे गेली. ते झाड आजही उभे आहे. कधी काळी शेतात गेलो की त्या झाडाकडे पाहिल्यावर आई आणि काकूचा तो उपचार आठवला की माझी आजही कढी पातळ होते !!

## (रात्रंदिवस आम्हाला युध्दाचा प्रसंग पान २ वरून)

त्यांचे युद्ध क्षणाक्षणाशी असते. जीवनाचा मार्ग प्रशस्त व्हावा, सुकर व्हावा हे त्यांनाही वाटत असते पण तसे होत नाही. त्यांची मुलबाळं चांगली शिकावीत असेही त्यांना वाटते पण ती लहानलहान मुलं त्यांच्यासोबत कामावर येतात, तेथेच उन्हातान्हात खेळतात आणि बिगाऱ्याचं पोरगं बिगारी होतं, गवंड्याचं गवंडी. रात्रंदिवस युद्धाचा प्रसंग तेही पिढ्यानूपिढ्या वारसाहक्काने स्वीकारतात.

तुकोबांना जगजेठी विठुबारायांच्या चरणी लीन व्हायचे होते. आजच्या सर्वसामान्याला ''नैय्या लगा दे मोरी पार' असं संसारचक्रातील व्युहात अडकल्यावर म्हणावे लागते. प्रसंग सारखाच पण मनस्थिती वेगवेगळी आहे. लौकीक आणि पारलौकीक या दोहोंसाठी युद्ध करावेच लागते, यात शंका नाही.

तुमचा आमचा विठूराया आपल्यासाठी आपला प्रपंच असतो आणि या प्रपंचाच्या पुर्ततेसाठी आपण युद्ध खेळत असतो पण हा प्रपंचच पंढरीचा विठूराया होऊन गेला तर ती आपल्या साऱ्यांच्या जीवनाची इतिकर्तव्यता ठरल्याशिवाय कशी राहील?